॥ मंगल देशा पवित्र देशा ॥

मंगल देशा पवित्र देशा महाराष्ट्र देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा ॥ धृ. ॥

राकट देशा कणखर देशा दगडांच्या देशा
नाजूक देशा कोमल देशा फुलांच्याही देशा ॥ १ ॥

अंजन कांचन करवंदीच्या काटेरी देशा
बकुळ फुलांच्या प्राजक्ताच्या दळदारी देशा ॥ २ ॥

भावभक्तीच्या देशा आणिक बुद्धीच्या देशा
शाहिरांच्या देशा कर्त्या मर्दांच्या देशा ॥ ३ ॥

हे ध्येय तुझ्या अंतरी निशानावरी नाचते करी
जोडी इहपरलोकाशी व्यवहारा परमार्थाशी ॥ ४ ॥

वैभवाशी वैराग्याशी वैभवाशी वैराग्याशी
जरीपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकच देशा ॥ ५ ॥